# पुणे विभागीय मंडळ, पुणे -४११००५

<u>परिपत्रक क्रमांक</u> :- पुविमं/शाखा-पी-२/दिनांक १४ जून२०१६ /501

<u>विषय</u> - **जून-जुलै २०१६** मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक परीक्षेच्या तारखांबाबत. . . .

सदर परिपत्रकान्वये सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविदयालयांचे प्रमुखांना कळविण्यात येते की, **जून-जुलै २०१६** मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या सर्व विषयांच्या (शास्त्र/(H.S.C Vocational) 'उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम'/बायफोकल इ.) प्रात्यक्षिक परीक्षा **सोमवार** दिनांक **२७ जून २०१६** ते **शुक्रवार** दिनांक ०८ **जुलै** २०१६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

**प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीतच उच्च माध्यमिक परीक्षेच्या संबंधित विषयांची तोंडी परीक्षा व श्रेणी परीक्षेचे आयोजन त्या त्या कनिष्ठ महाविदयालयामध्ये करावे व सदर परीक्षेचे वेळापत्रक पुणे विभागीय मंडळाकडे पाठवावे. त्यानुसारच प्रात्यक्षिक/तोंडी/प्रकल्प/श्रेणी परीक्षा घेण्यात यावी.**

<u>ऑक्युपेशनल ओरिएन्टेशन</u> (OCCUPATIONAL ORIENTATION) या विषय गटातील स्टेनोग्राफी (इंग्रजी व मराठी) या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा एकाच वेळी सर्व कनिष्ठ महाविदयालयांमध्ये घेणे आवश्यक असल्याने सदर विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील निर्धारित दिनांकांना आयोजित करावी.

| अ.क्र | विषय | परीक्षेचा वार | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | स्टेनोग्राफी (इंग्रजी) (८०) | सोमवार | २७/०६/२०१६ |
| २. | स्टेनोग्राफी (मराठी) (८१) | मंगळवार | २८/०६/२०१६ |

तसेच लायब्ररी सायन्स व फ्रेश वॉटर फिश कल्चर या दोन विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा कायमस्वरुपी परीक्षा योजना केल्यामुळे संबंधित दोन्ही विषयांच्या परीक्षा पुस्तिकेनुसार शास्त्र विषय प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत आयोजित कराव्यात.

वरील प्रमाणे **सोमवार** दिनांक **२७ जून २०१६** ते **शुक्रवार** दिनांक ०८ **जुलै** २०१६ या <u>कालावधीत</u> आपण प्रात्यक्षिक परीक्षेचे समग्र वेळापत्रक तयार करुन ते सर्व संबंधितांना तपशिलवार आगाऊ कळवावे, आपल्या संलग्न कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थी <u>वेळापत्रक व माहितीविना प्रात्यक्षिक/तोंडी/प्रकल्प/श्रेणी परीक्षेपासून वंचित राहणार नाहीत</u>. या बाबत दक्षता घ्यावी. प्रात्यक्षिक परीक्षेपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

D/P2 BRANCH/PRACT.DATE

पर्यावरण शिक्षण हा विषय कला, वाणिज्य, विज्ञान, उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम व सर्व द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे.सदर विषयाची परीक्षा सोमवार दिनांक **२७ जून** २०१६ ते **शुक्रवार** दिनांक ०८ **जुलै** २०१६ या कालावधीत घेण्यात यावी. तसेच संबधित विषयाकरिता बहिस्थ परीक्षकाची नियुक्ती मंडळ कार्यालयाकडून करण्यात येणार आहे.अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती आपल्या स्तरावरुन करण्यात यावी

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित आणि संख्याशास्त्र या विषयांकरिता बहिस्थ परीक्षकाची नियुक्ती कार्यालयाकडून करण्यात येणार आहे.

अंतर्गत परिक्षकाची नियुक्ती प्राचार्यांनी आपल्या स्तरावरुन करावी.

उपरोक्त प्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षेच्या आयोजनामध्ये सर्व त-हेची गोपनीयता पाळावी. अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांची नावे अन्य कोणाला कळणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच प्रात्यक्षिक परीक्षेचे कामामधील सर्व संबंधितांना गोपनीयता पाळण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात. मंडळाने नियुक्त केलेल्या शिक्षकाव्यतिरिक्त कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर परस्पर अंतर्गत/बहिस्थ परीक्षक नेमावयाचा असल्यास सदर शिक्षकाची शैक्षणिक पात्रता पडताळून पाहून पात्र, शिक्षकांच्याकडून प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. याबाबत बाहय परिक्षकांचे नाव, परिक्षकाचे मूळ कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व ज्या ठिकाणी नेमणूक केली आहे त्या क.म. विद्यालयास कळविण्यात यावे. मात्र याबाबत दोन्ही क.म. विद्यालयांनी आवश्यक ती गोपनीयता पाळावी. कोणत्याही परिस्थितीत गोपनीयतेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना दयाव्यात.

श्रेणी सुधार योजनेअंतर्गत (क्लास इम्पप्रव्हमेंट स्कीम) प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांना तोंडी व लेखी/प्रात्यक्षिक व पर्यावरण शिक्षण परीक्षेस प्रत्येक वेळी नव्याने प्रविष्ठ व्हावे लागेल. मात्र आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयाचे गुण, (आधीच्या परीक्षेचे) संगणकीय गुण तक्त्यात कळविण्यात यावेत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) च्या सर्व नियमित विद्यार्थीना व पुनर्परीक्षार्थ्यांना तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा पुन्हा देणे आवश्यक राहील. कोणत्याही पुनर्परीक्षार्थीचे तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे मागील गुण पुढे ओढून घेतले जाणार नाही. तशा स्पष्ट लेखी सूचंना कनिष्ठ महाविदयालयाने विदयार्थ्यांना दयाव्यात व विदयार्थ्यांची पोहोच घ्यावी.

इ. १२ वी च्या विदयार्थ्यांना प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार पुन्हा देणे अनिवार्य राहील. मागील परीक्षेतील प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे गुण पुढील परीक्षेसाठी कोणत्याही कारणास्तव ग्राहय धरले जाणार नाहीत याची सर्व विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी :** कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रकल्पासाठी/अंतर्गत मूल्यमापनासाठी असणा-या गुणांची नोंद जपून ठेवायची असून पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना पुन्हा प्रकल्प करण्याची आवश्यकता नसून त्यांचे यापुर्वीचे गुण मंडळास पाठवावयाचे आहेत.

**खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यासाठी** : इ. १२ वी च्या परीक्षेत खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्याचे प्रकल्प नियमित विद्यार्थ्याप्रमाणेच घेवून त्याचे गुण मंडळास कळवावयाचे आहे. तसेच जे खाजगीरित्या प्रविष्ठ होवून अनुत्तीर्ण होतील त्यांचे प्रकल्पाचे गुण कनिष्ठ महाविद्यालयाने अगोदरच्या वर्षाचे पाठवावयाचे आहे.

उपरोक्त सर्व बाबी संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी संबंधित परिक्षार्थींना लेखी स्वरुपात कळवून त्याची प्रत दफ्तरी ठेवावी. तसेच सूचना फलकावर याबाबत प्रसिध्दी द्यावी.

**महत्वाचेः-** बहिस्थ परिक्षकांनी विभागीय मंडळास स्वतंत्रपणे प्रात्यक्षिक परिक्षेसंदर्भात गोपणीय अहवाल पाठवावा. सदर गोपणीय अहवालाचे प्रपत्र मंडळाच्या संकेत स्थळावरुन ( **www.sscboardpune.in**) काढण्यात यावे.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५

दिनांक : १४ जून २०१६

प्रति,

पुणे विभागीय मंडळ कक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालय प्रमुख.

प्रत माहितीसाठी.

१. मा. सचिव राज्यमंडळ, पुणे-४
२. शिक्षण अधिकारी (माध्यमिक) पुणे/अहमदनगर/सोलापूर

D/P2 BRANCH/PRACT.DATE